**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१**
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com
जा.क्र./प्रशि-४/अअविसेसंमा/२०१६-१७/ २१६८६ दिनांक : 3 DEC 2016

प्रति,

प्राचार्य,
अनुदानित अध्यापक विद्यालय,
पुणे विभाग,(पुणे/अहमदनगर/सोलापूर)

**विषय : अध्यापक विद्यालयांचे सन २०१६-१७ चे संच मान्यता प्रस्तावाबाबत.**

संदर्भ : १.मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र., शिशिप्रशा-१(१)/एनसीटीई रेग्यु-१४/१२२५, दिनांक १५.४.२०१५

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाने १ डिसेंबर २०१४ रोजी राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, मान्यता मानदंड तथा क्रियाविधी विनियमन २०१४ अधिसूचित केला आहे. या अधिनियमातील जोडपत्र-(Appendix-II) हे डी.एल.एड या अभ्यासक्रमासंदर्भात असून यातील परिच्छेतद क्र ५ प्रमाणे अध्यापक विद्यलायातील शिक्षक संख्या व त्यांचे अर्हतेबाबत निकष दिलेले आहेत.

तथापि शासकीय व अनुदानित अध्यापक विद्यालयांतील शिक्षक संख्या राज्य शासनाने अद्याप एनसीटीई निकष २०१४ प्रमाणे मंजूर केलेली नसल्याने पूर्वीच्याच निकषांप्रमाणे संच मान्यता करावी, असे संदर्भीय पत्रान्वये आदेशीत केले आहे. त्यानुसार पुणे विभागातील अनुदानित अध्यापक विद्यालयांची सन २०१६-१७ ची संच मान्यता करुन घेणे आवश्यक आहे.

तरी **दिनांक ५.१२.२०१६** रोजी खालील कागदपत्रासह संच मान्यता प्रस्ताव सादर करण्यात यावा.

१.संस्थेचे पत्र.
२.एनसीटीई व एससीईआरटी मान्यता पत्र.
३.अध्यापक विद्यालय अल्पसंख्याक असल्यास अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र.
४.मागील मान्य सेवक संच मान्यता प्रत.
५.माध्यम/तुकडी इ. बदल असल्यास त्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडील प्राप्त आदेशाची प्रत.
६.अध्यापक विद्यालयात सध्या मंजूर, कार्यरत व रिक्त, एकूण पदांचा नावासह तक्ता.
७.सन २०१६-१७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी.
८.द्वितीय वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची यादी.

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत : माहितीस्तव-**
मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०